गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## सहा महिने कालावधीचा मच्छिमारी प्रशिक्षण वर्ग

ता. 12 जून 2019
22 ज्येष्ठ 1941

मत्स्योद्योग संचालनालयाने 1 जुलै 2019 पासून जुने गोवे येथील एला धावजी येथील मच्छिमारी प्रशिक्षण केंद्रात सुरू होणा-या सहा महिने कालावधीच्या मच्छिमारी प्रशिक्षण वर्गासाठी अर्ज मागविले आहेत.

या मच्छिमारी प्रशिक्षण वर्गात फिशिंग क्राफ्ट, गीयर फंडामेंटल ऑफ नेविगेशन आणि सीमनशीप, मरीन डिझल इंजिनाची मेन्टेनेन्स आणि ऑपरेशन, आधुनिक जाळे विणणे, सीफुड वेल्यु ॲडिशन मार्केटींग ॲक्वाकल्चर, अक्वेरियम बनविणे आणि स्वीमिंग अशा विषयांचे प्रशिक्षण देण्यात येईल.

अर्जदार आठवी परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. 18 ते 35 वयोगटातील अर्जदार प्रवेशास पात्र आहे. वर्गीकृत जाती, जमातीतील उमेदवारांना तसेच मच्छिमारी समाजातील अनुभव असलेल्या युवकांना प्राधान्य देण्यात येईल. प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा 1 हजार रूपये विद्यावेतन देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी आणि अर्ज नमुन्यासाठी मच्छिमार प्रशिक्षण केंद्र, एला धावजी, जुने गोवे किंवा मुख्य कचेरी, मत्स्योद्योग खाते, पणजी येथे संपर्क साधावा. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख 26 जून अशी आहे.

मा/वाप/नामगा/जॉआ/रना/प्रधु/2019/326